# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

## "बांधकाम चा परवाना"

## COMMENCEMENT CERTIFICATE

**सुधारित बांधकाम परवानगी**

परवाना क्रमांक :- ११२/२०२३-२४

फाईल क्रमांक :- ३६/१७/२०२३-२४

दिनांक :- २१/१२/२०२३

परवाना धारण करण्याचे नाव :- श्री. कृष्णा राजेंद्र मालु, श्री. संजय मथुरादास राठी
भू.क्र. :- १७ व १८, गट क्रमांक :- ५१/४
मौजे :- गारखेडा, छत्रपती संभाजीनगर

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २५३ व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ४५ अन्वये व तत्संबधित नियमास अनुसरुन खालीलप्रमाणे बांधकामाची/ दुरुस्तीची परवानगी दिली जाते. सदरील परवान्याचा अंमल आज तारखेपासुन **एक** वर्षापयात राहील. बांधकाम पूर्ण झाल्याबाबत लेखी माहिती तपासणीसाठी या कार्यालयात पाठविण्यात यावी. नगर रचनाकार यांनी **लाल** रंगाने दुरुस्ती/ मान्य केलेल्या नकाशा प्रमाणे बांधकामाची परवानगी खालील अटींवर दिली जाते.

०१. सदर बांधकाम परवाना हा विकास परवानगीच्या अनुषंगाने दिला जात आहे. यामध्ये नमुद केलेल्या भूखंडा संबंधी भविष्यात कोणाचे मालकी हक्क, इजमेंट हक्क, अगर इतर कोणत्याही हित संबंधास बाधा निर्माण होत असतील तर त्यांनी आपल्या तक्रारी/ वाद न्यायालयामार्फत परस्पर दुर करुन घ्याव्यात या संबंधाने उद्भवणाऱ्या कोणत्याही बाबींची जबाबदारी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेवर राहणार नाही.

०२. शेजाऱ्याच्या कोणत्याही प्रकारच्या हक्कात बांधा निर्माण होईल असे बांधकाम करण्यात येवू नये.

०३. जोत्याचे प्रमाणपत्र घेणेपुर्वी नगर भूमापन अधिकारी/ तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांच्यामार्फत भूखंड आखणी करुन घेणे अर्जदार व वास्तुविशारद यांच्यावर बंधनकारक राहील.

०४. बांधकाम साहित्य व माती महानगरपालिकेच्या रस्त्यावर ठेऊ नये. या बाबत दिनांक २४/११/२०२३ रोजी दिलेले हमीपत्र अर्जदारास बंधनकारक राहील.

०५. सदर भूखंडास/ मिळकतीस मा. जिल्हाधिकारी यांचे मार्फत म.ज.म.अधि.१९६६ चे कलम ४४ अन्वये अकृषिक वापराचा आदेश No. RB/Desk-II/NAA/NAP/15/86 Dated 30/11/1986 अन्वये प्राप्त आहे.

०६. या कार्यालयाचे संबंधित अधिकारी जागेवर प्रत्यक्ष पाहणीसाठी आले असता, त्यांचे अवलोकनार्थ मंजुरीचे संबंधित कागदपत्रे दाखविण्यात यावे.

०७. जोत्यापर्यंत (Plinth Level) चे बांधकाम झाल्यानंतर सदरहु कार्यालयास त्याप्रमाणे अधिकृत वास्तुविशारदच्या प्रमाणपत्रासह कळवावे.

०८. मंजुर बांधकाम नकाशाच्या विरुध्द जर बांधकाम करण्यात आले तर आपणा विरुध्द महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-४३ सह ५२, कलम-५४, कलम-५३ प्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

०९. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २६३ अन्वये बांधकाम पूर्ण झाल्यानंतर भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate) घेण्यात यावे व त्यानंतरच इमारतीचा वापर सुरु करावा नसता आपल्या विरुध म.प्रा.नि.व न.र. अधि. १९६६ चे कलम-५३ अन्वये पुढील कार्यवाही करण्यात येईल.

१०. भोगवटा प्रमाणपत्र घेतेवेळी महानगरपालिका परवानाधारक प्लंबरचे जलनिःसारण जोडणी बाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

११. छतावर पडणाऱ्या पावसाचे पाणी संकलीत करुन विंधन विहीर असल्यास त्यांचे पुर्नभरण करावे. जेथे विंधन विहीर नाही अशा ठिकाणी सोकपीट (शोषकूप) तयार करुन त्यामध्ये त्याचा निचरा करावा.

१२. पुर्वीच्या बांधकाम परवानगी वेळी (बा.प.क्र. ३५५/२०१७-१८) शहर विकास निधी रक्कम रु. १,८७,९८२/- च.क्र. ४४०१ दि. २९/०६/२०१७ रोजी भरणा केलेला आहे. आता शहर विकास निधी रक्कम रु. १,३९,०००/- च.क्र. ३५९८६ दि. १२/१२/२०२३ रोजी भरणा केलेला आहे

१३. पुर्वीच्या बांधकाम परवानगी वेळी (बा.प.क्र. ३५५/२०१७-१८) जमीन विकास शुल्क रक्कम रु. ३३,७५०/- च.क्र. ४४०३ दि. २९/०६/२०१७ रोजी भरणा केलेला आहे.

१४. पुर्वीच्या बांधकाम परवानगी वेळी (बा.प.क्र. ३५५/२०१७-१८) प्रिमियम (Paid F.S.I 30%) रक्कम रु. ६,०७,००९/- च.क्र. ४४०२ दि. २९/०६/२०१७ रोजी भरणा केला आहे.

१५. पुर्वीच्या बांधकाम परवानगी वेळी (बा.प.क्र. ३५५/२०१७-१८) विकास खर्च रक्कम रु. ४,२९,२५०/- च.क्र. ४४०४ दि. २९/०६/२०१७ रोजी भरणा केला आहे.

१६. प्रिमियम(Ancillary Area)रक्कम रु.७,१२,०००/- च.क्र. ३५९८७ दि. १२/१२/२०२३ रोजी भरणा केला आहे.

१७. बांधकाम परवानगी नुतनीकरण शुल्क रु. ३,०००/- च.क्र. ३५९८८ दि. १२/१२/२०२३ रोजी भरणा केला आहे.

१८. भोगवटा प्रमाणपत्र घेणेपुर्वी सामासातील अंतरामध्ये कमीत कमी (०५) झाडे लावून त्यांचे संगोपन करावे.

१९. जागेवर झाडे तोडावयाची झाल्यास प्रथम सक्षम प्राधिकरणामार्फत परवानगी घेण्यात यावी.

२०. जागेवरील विद्युत वाहिनी असल्यास ती प्रत्यक्ष बांधकाम सुरु करण्यापुर्वी संबंधित खात्याकडून काढुन घ्यावी नंतरच बांधकाम सुरु करावे.

२१. जोत्याचे प्रमाणपत्र घेण्यापुर्वी सर्व इमारती सक्षम कार्यालयामार्फत मोजणी नकाशावर बसवून तसा मोजणी नकाशा या कार्यालयात सादर करावा.

कृपया मागे पहा.

Scanned with CamScanner

२२. भविष्यात पोच रस्त्याबाबत काही वाद/ उडचण निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार यांची राहील.

२३. बांधकामाच्या इमारतींना जाळीद्वारे बंदिस्त व आच्छादित करुन त्या संदर्भाने इतर सुरक्षात्मक उपया योजना करणे तसेच सार्वजनिक रस्त्यावर आणि सार्वजनिक जागांवर बांधकाम साहित्याची साठवणूक न करणे व इमारतींच्या बांधकामामुळे निर्माण होणारी धुळ हवेत पसरुन हवेचे प्रदुषण होणार नाही या संदर्भाने दक्षता घेणे अर्जदारास/ विकासकास बंधनकारक राहील.

२४. सदर बांधकामा करीता आवश्यक असणारे पाणी महानगरपालिकेच्या जल मल केंद्रातून (STP) उपलब्ध करुन घेण्यात यावे. इमारतीच्या बांधकामस आवश्यक पाणी सदर केंद्रामधून उपलब्ध करुन घेऊन वापरण्यात यावे.

२५. विकास नियंत्रण नियमावलीनुसार Solar System & Rain Water Harvesting करीताची अंमलबजावणी करणे अर्जदारास बंधनकारक राहील.

२६. बांधकामाच्या इमारतींना जाळीद्वारे बंदिस्त व आच्छादित करुन त्या संदर्भाने इतर सुरक्षात्मक उपया योजना करणे तसेच सार्वजनिक रस्त्यावर आणि सार्वजनिक जागांवर बांधकाम साहित्याची साठवणूक न करणे व इमारतींच्या बांधकामामुळे निर्माण होणारी धुळ हवेत पसरुन हवेचे प्रदुषण होणार नाही या संदर्भाने दक्षता घेणे अर्जदारास/ विकासकास बंधनकारक राहील.

२७. Promoter should obtain Maha RERA Registration as per section 3 of the Real Estate (Regulation & Development) Act,2016

२५. कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/नरवि/उसंनर/२०२२/५१४ दि. ०९/०३/२०२२ अन्वये व एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्याहन नियमावलीतील नियम क्र. 4.4.2 (i) मधील तरतुदीनुसार इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिगकरीता प्रस्तावित इमारतीमध्ये ०२ इलेक्ट्रिक चार्जिंग स्टेशनची (पॉईटची) व्यवस्था करावी.

२६. मुळ जमीन मालक/ रेखांकनधारक श्री. अनिल गोविंद निरंतर व इतर यांनी नोंदणीकृत हक्कसोड प्रमाणपत्र क्रमांक ७६१६/२०१६ दि. ०३/१२/२०१६ अन्वये हक्कसोड प्रमाणपत्र करुन दिलेले आहे. सदरील हक्कसोड पत्रात भूखंड क्रमांक ३२ व ३३ दाखविलेले आह. ते आमन्य करण्यात येत आहे. तसेच रेखांकनातील खुल्या जागेचे क्षेत्र १५१२.५५ चौ.मी. कायम ठेवण्यात येत आहे.

२७. मुळ मंजुर रेखांकनातील संपूर्ण खुल्या जागेचे व रस्त्याचे हक्कसोड पत्र क्र. ४५७८/२००९ दि. ११/०९/२००९ रोजी झालेले असून, अर्जदार श्री. कृष्णा राजेंद्र मालु व इतर हे संपूर्ण खुल्या जागेचे समर्थन करतील. नविन भूखंडाचे समर्थन करणार नाही. याबाबत दिलेले हमीपत्र अर्जदारास बंधनकारक राहील.

२८. तहसिलदार, तहसिल कार्यालय, औरंगाबाद यांना इकडील कार्यालयाचे पत्र जा.क्र./मनपा/नरवि/ससंनर/२०१७/१३३३ दि. १०/०७/२०१७ अन्वये मंजुर रेखांकनातील खुल्या जागेचे क्षेत्र १५१२.५५ चौ.मी. कायम ठेवणे व वरील अनुक्रमांक २७ मधील हक्कसोड पत्रामध्ये नव्याने दर्शविलेले भूखंड अमान्य करणे बाबत व नोंद न घेणे बाबत कळविण्यात आलेले आहे.

२९. मंजुर रेखांकन क्रमंक AGD/LYT/710/80 Date 26/06/1980 नुसार खुली जागा १५१२.५५ चौ.मी. कायम खुली ठेवणे बंधनकारक राहील.

३०. श्री. अनिल गोविंद निरंतर व इतर यांना कार्यालयाने पत्र जा.क्र./मनपा/नरवि/ससंनर/२०१७/१३३२ दि. १०/७/२०१७ अन्वये मंजुर रेखांकन नकाशाप्रमाणे खुल्या जागेचे क्षेत्र कायम ठेवण्यात येत असून, त्यांनी हक्कसोड पत्रामध्ये नव्याने दर्शविलेले भूखंड क्र. ३२ व ३३ अमान्य करण्यात येत असल्याचे कळविले आहे.

३१. कार्यालयीन आदेश जा.क्र./मनपा/नरवि/ससंनर/२०१७/१३३४ दि. १०/०७/२०१७ अन्वये प्रस्तावित भूखंडाचे एकत्रिकरण करण्यात आलेले आहे.

३२. यापूर्वी दिलेली बांधकाम परवानगी क्रमांक **३५५/२०१७-१८** दिनांक **१०/०७/२०१७** बांधकाम परवानगी संचिका क्रमांक **९०१/१७/२०१६-१७** अन्वये दिलेली बांधकाम परवानगी रद्द करण्यात आली आहे. त्यामधील अटी/ शर्ती अर्जदार यांच्यावर बंधनकारक राहील.

३२. सद्यस्थितीत महानगरपालिकेस पाणी पुरवठा करणे शक्य नाही. जेव्हा महानगरपालिकेकडे अतिरिक्त पाणी उपलब्ध होईल त्यावेळी आपणांस पाणी पुरवठा करणे शक्य होईल. तरी पाणी पुरवठया बाबत अर्जदारास आग्रह धरता येणार नाही.

**(प्रशासकीय तजविज दि. १२/१०/२०२३)**

२१/१२/२०२३

**प्रशासक,**
**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका,**
**यांचे करीता.**

**प्रतिलिपी :-**

O.C. Signed By D.D.T.P.

०१. मा. जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव सादर.
०२. सहाय्यक अधिकारी (अतिक्रमण) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका (वि.क्र. VII) यांना माहितीस्तव

**सूचना**

०१. जमीनीचे अनाधिकृत प्लॉटीग/गुठेवारी करणे/ विना परवानगी बांधकाम करणे, मंजुर परवानगीचे विरोधात बांधकाम करणे, भोगवटा प्रमाणपत्र घेतल्याविना इमारतीचा वापर करणे, परवानगी विना जमीनीचा / इमारतीचा वापर बदलणे, मंजुर परवानगी आदेशातील अटी शर्तीचे उल्लघंन करणे, इत्यादी बाबी या महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२, ५३, ५४ च्या तरतुदीनुसार **अजामीनपात्र दखलपात्र गुन्हा** (Nonbailable Cognizable Offence) ठरविण्यात आले असून **अपराध सिध्द झाल्यानंतर** (After Conviction) संबंधित जमीन मालक, विकासक, गुत्तेदार, अभिकर्ता, भोगवटादार या पैकी जे कोण संबंधित असतील त्यांना **एक महिना ते तीन वर्षे पर्यंत कैद** किंवा रुपये २०००/- ते रुपये ५०००/- पर्यंत दंड किंवा दोन्ही याप्रमाणे शिक्षेची तरतुद आहे.

०२. वरील प्रकारच्या **अनाधिकृत विकासाबाबत** महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम,१९६६ चे कलम-५२, ५३, ५४ नुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका इतर कोणतीही संबंधित जमीन मालक, विकासक, गुत्तेदार, अभिकर्ता, भोगवटा धारक यांचे विरोधात **संबंधित पोलीस स्टेशनकडे** लेखी फिर्याद दाखल करु शकते (महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील शासकीय परिपत्रक क्रमांक टी.पी.बी ४३८३/१६५९/यु.डी.-५ दि. १५ जुन, १९८३)

०३. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-५३ (१) नुसार वरील अनुक्रमांक १ मध्ये नमुद अनाधिकृत विकास हे **कायमस्वरुपी अनाधिकृत विकास** ठरविण्यात आले असून कितीही वर्षानंतर तो उघडकिस आल्यावर त्यांचे विरोधात **छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका** किंवा इतर संबंधित शासकीय/ निमशासकीय संस्था किंवा **खाजगी व्यक्ती** वरील अनाधिकृत विकासाचे संबंधित जमीन मालक, विकासक, गुत्तेदार, अभिकर्ता, भोगवटादार जे जे कोण संबंधित असतील त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशनकडे लेखी फिर्याद दाखल करु शकते.

Scanned with CamScanner

